# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

जा. क्र. मऔविम/मुनि/D77634/2016 दिनांक : 16 /11/2016

## परिपत्रक

**विषय: औद्योगिक धोरण-2013 व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामुहिक प्रोत्साहन योजना-2016 नुसार सुक्ष्म व लघु उद्योजकांसाठी भूखंड राखीव ठेवण्याबाबत.**

**संदर्भ:** मा. संचालक क्र. मंडळाच्या दि. 30/07/2016 रोजीच्या 367 व्या बैठकीत पारीत करण्यात आलेला ठराव क्र. 5590

मऔविमने औद्योगिक वापरासाठी संपादन केलेल्या क्षेत्राचा आराखडा तयार करताना त्यामध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक खुली जागा, सुविधा क्षेत्र आणि रस्ते इत्यादींचे प्रयोजन करुन मागणी नुसार लहान, मध्यम आणि मोठया आकाराच्या भूखंडांचे आरेखन करण्यात येते. सदर आराखडयास अंतिम मान्यता मिळाल्यानंतर भूखंड वाटप समितीच्या निर्णयानुसार त्यातील भूखंडाचे वाटप करण्यात येते.

सद्यस्थितीत मऔविमच्या औद्योगिक क्षेत्रांचा आराखडा तयार करतेवेळी परिपत्रक क्र. मऔविम/मुनि/A47082/2015 दि. 02/06/2015 अन्वये लहान, मध्यम व मोठया भूखंडाखालील क्षेत्राच्या प्रमाणाबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत. याव्यतिरिक्त शासनाने प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण-2013 नुसार मऔविमच्या नवीन औद्योगिक क्षेत्रांमध्ये सुक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी 10 % क्षेत्र राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेबाबतच्या दि. 11/02/2016 रोजीच्या शासन निर्णयाअन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या एकुण सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी असलेल्या औद्योगिक भूखंडापैकी 20 % भूखंड अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती उद्योजकांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत काही औद्योगिक क्षेत्रांमध्ये लहान भूखंडांची मागणी खुप वाढल्याचे निदर्शनास आलेले आहे. परंतु औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करतांना सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी नेमकी किती जागा राखीव ठेवावी याबाबत निश्चित मार्गदर्शक तत्वे अस्तित्वात नाहीत ही बाब मा. संचालक मंडळाच्या दि. 30/07/2016 रोजीच्या 367 व्या बैठकीत विषय क्र. 11 अन्वये सादर करण्यात आली होती. याप्रकरणी झालेल्या सविस्तर चर्चेअंती पारीत करण्यात

आलेल्या ठराव क्र. 5590 च्या अनुषंगाने औद्योगिक क्षेत्राच्या आराखडयात सुक्ष्म व लघु उद्योजकांसाठी भूखंड राखीव ठेवणेबावत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

1) यापुढे नवीन औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करताना सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी एकूण औद्योगिक भूखंडांखालील क्षेत्राच्या 20% क्षेत्र (200, 500, 1000 व 2500 चौ. मी. पर्यंत क्षेत्राचे भूखंड) राखीव ठेवण्यात यावे. यापैकी अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती उद्योजकांसाठी दि. 11/02/2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार क्षेत्र राखीव ठेवण्यात यावे.

2) महामंडळाने यापूर्वीच विकसित केलेल्या परंतु जेथे सरळ पद्धतीने भूखंडांचे वाटप करण्यात येते त्या औद्योगिक क्षेत्रात जे क्षेत्र वाटपासाठी उपलब्ध होईल, त्यामध्ये 20% क्षेत्र सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात यावे व त्यापैकी अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती उद्योजकांसाठी दि. 11/02/2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार क्षेत्र राखीव ठेवण्यात यावे.

3) उपरोक्त मुदयात नमूद केलेल्या सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी राखीव 20% क्षेत्रामध्ये आरेखित केलेल्या भूखंडांचे भविष्यात एकत्रीकरण करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी उपरोक्त निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर परीपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(शाकोटे)

मुख्य नियोजक
मऔविम, मुंबई - 93.

प्रत: मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत माहितीकरीता :1) सर्व विभागप्रमुख, मऔविम.

2) सर्व कार्यकारी अभियंता / सर्व वि. नि. प्रा., मऔविम.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता:

1) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.

2) नियोजन विभागातील सर्व अधिकारी.